PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Aai
Year: 1981

Song: Shubh mangal charani gan
Lyricist: Jagdish Khebudkar

शुभमंगल चरणी गण नाचला
शुभमंगल चरणी गण नाचला
नाचला कसा तरी पाहू चला हो
नाचला कसा तरी पाहू चला
शुभमंगल चरणी गण नाचला
गणपती नाचून गेल्यापाठी
शेंदूर ठेवला कोणासाठी
गणपती नाचून गेल्यापाठी
हे... हे...हे...
गणपती नाचून गेल्यापाठी
शेंदूर ठेवला कोणासाठी
पठ्ठे बापूराव कविची गाती
अट्ठी मराठी बालेघाटी
खबर आणली मग वरवर वरची
बरबर पुढची शाहू नगरची कोल्हापूरची
पल्ला थेट पंचगंगेला नीट रस्ता पोहोचला
शुभमंगल चरणी गण नाचला
शुभमंगल चरणी गण नाचला

अरे अनोळखी मी
हाक मारीते चढत्या उंच स्वरात
दे सादाला साद राजसा
सुनी चालली रात
रात चैताची जाते सुनी गं
माझ्या राजाला कळवा कुणी
गं बाई माझ्या राजाला कळवा कुणी
राजसा अरे राजसा
व्हय रं जी जी रं जी जी जी जी
रात चैताची जाते सुनी गं

माझ्या राजाला कळवा कुणी
गं बाई माझ्या राजाला कळवा कुणी
माझ्या राजाला कळवा
माझ्या राजाला कळवा
माझ्या राजाला कळवा
माझ्या राजाला कळवा कुणी
आता गं बाई राजाला कळवा कुणी

फड सांभाळ तुऱ्याला गं आला
फड सांभाळ तुऱ्याला गं आला
तुझ्या ऊसाला लागंल कोल्हा गं
तुझ्या ऊसाला लागंल कोल्हा
तुझ्या ऊसाला लागंल कोल्हा
आता गं तुझ्या ऊसाला लागंल कोल्हा
कोल्हा गं तुझ्या ऊसाला लागंल कोल्हा
आता गं तुझ्या ऊसाला लागंल कोल्हा

नाव गाव इचार जा त्याला
अगं नाव गाव इचार जा त्याला
गं... नाव गाव इचार जा त्याला
कसा चोरून बघतोय मेला गं
कसा चोरून बघतोय मेला
अगं कसा चोरून बघतोय मेला गं
कसा चोरून बघतोय मेला
कसा चोरून बघतोय मेला गं
कसा चोरून बघतोय मेला
अहो कसा चोरून बघतोय मेला गं
कसा चोरून बघतोय मेला
धरा धरा हो पकडा त्याला

धरा धरा हो पकडा त्याला
बिलकुल सोडू नका
हो तुम्ही याला बिलकुल सोडू नका
लाईन मारतोय बघा

माझ्यावर लाईन मारतोय बघा
लाईन मारतोय बघा
माझ्यावर लाईन मारतोय बघा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*